# पथ विभागाकडील रिईनस्टेटमेंटच्या कामासाठी विशेष निविदा अटी व शर्ती

१. सदर कामासाठी ठेकेदाराकडे स्वतःची अथवा भाडेतत्वावर वाहने असणे बंधनकारक आहे. त्याबाबतची कागदपत्रे निविदेसोबतच जोडणे बंधनकारक राहिल.

२. निविदा भरल्यानंतर निविदा छाननीत पात्र निविदाधारकांची बीड कॅपॅसिटी व फायनान्सियल कॅपॅसिटी मर्यादा संपल्यानंतर पुढील निविदा L2 / L3 दराचे निविदा धारकाची पात्रता तपासून निवदेमधील L1 दरापेक्षा कमी दराने L2 / L3 निविदाधारकास रितसर काम देण्यात येईल.

३. सदर कामाच्या ठेकेदार यांनी प्रत्येक महिन्याच्या शेवटी प्रत्यक्ष काम करताना होणारा बदल बचतवाढ तक्त्यात अंतर्भुत करुन संबंधित कार्यकारी अभियंता यांना सादर करावा व त्यानुसार संभाव्य बचतवाढ तक्ता मान्य करुन घ्यावा. अंतिम बचतवाढ तक्त्यात मान्य मर्यादेपेक्षा जादा बाबींचा विचार करण्यात येणार नाही.

४. सदर कामाची देयके दर तीन महिन्यांनी ठेकेदार यांनी संबंधित कार्यकारी अभियंता यांना सादर करावीत व अशा प्रकारे बिल सादर न केल्यास सदर बिलाची जबाबदारी खात्याची राहणार नाही. बिल तरतुदीअभावी अदा न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

५. निविदा संचात अन्यत्र काहीही समकक्ष सूचना आढळुन आल्यास, वरील अटीशर्तीच अंतीम राहतील.

६. मा. शहर अभियंता यांनी कार्यालयीन परिपत्रक क्रं.पथ/६६४७ दि. ११/११/२०२२ नुसारच दुरुस्तीची कामे करण्यात यावीत.

७. खड्डे दुरुस्तीसाठी खड्डा चौकोनी / आयताकार करणेकामी जनरेटवर चालणा-या कटर/ब्रेकरची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

(विकास ढाकणे)
अति.महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
मा. अति. महानगरपालिका आयुक्त (ज./वि/इ)
ठराव क्र. ९/७०६
दिनांक २९/०२/२०२४

MD-Road/381/2025

मुख्य अभियंता (पथ) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक –
दिनांक –

मा. अति. महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस सविनय सादर...

विषय :- पथ विभागाकडील टेंडर निविदा अटी शर्तीमध्ये अंतर्भुत करणेस मान्यता मिळणेबाबत.

पुणे महानगरपालिका पथ विभागामार्फत दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या डांबरीकरणाच्या कामामध्ये खालील निविदा अटी शर्तीमध्ये सुधारणा केल्यास डांबरीकरणाचे काम गुणवत्तापुर्वक व निविदा कालावधीमध्ये पुर्ण होतील, तसेच शासनास Register Stamp Duty मुळे मोठ्या प्रमाणात महसुलमध्ये वाढ होईल.

१. हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे कामासाठी ठेकेदार यांचा हॉटमिक्स बॅच मिक्स प्लॅन्ट स्वमालकीचा किंवा भाडे तत्वावर असलेले Register Stamp Duty भरलेले करार पत्र, २६ A अथवा gst-३ B भरलेले कागदपत्रे बंधनकारक आहे
२. डांबरी हॉट मिक्स (बॅच टाईप) प्लॅन्ट पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीपासुन ३५ कि.मी. असणे बंधनकारक आहे.

(स्वाक्षरी) १९/०९/२५
आशित जाधव
अधिक्षक अभियंता (पथ)
पुणे महानगरपलिका

(स्वाक्षरी) १९.०९.२०२५
अनिरूध्द पावसकर
मुख्य अभियंता (पथ)
पुणे महानगरपलिका

प्रत– मा. उप आयुक्त
परिमंडळ क्र. १ ते ५
पुणे महानगरपालिका.

सर्व परिमंडळ / वार्ड ऑफिस यांनी
टेंडर मध्ये अटींचा समावेश करावा

(स्वाक्षरी) १९/०९/२०२५
ओमप्रकाश दिवटे
अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका

# विशेष अटी शर्ती

| अ. क्र. | प्रदान ठराव क्र. व दिनांक | अट क्र. | |
|---|---|---|---|
| | | | कामाचे नाव :- येरवडा हॉट मिक्स प्लांट येथे खडी पुरवठा करणे |
| १ | १०/२८० दि ४/२/२०२१ | १ | सदर टेंडरसाठी ठेकेदार रजिस्ट्रेशन अट शिथिल करण्यात आली आहे. |
| | | २ | मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे खाण मालकाने अद्यावत रॉयल्टी भरल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे. |
| | | ३ | या कामासाठी ज्या खाणीतून ठेकेदार इयर मानस्त्र खडी तयार करणार आहे ती खडी I.S.383 तसेच I. S. 2386 नुसार असणे आवश्यक आहे. सदरची खडी मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून चाचणी ( तपासणी) करून तिचा अहवाल निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदरची खडी चाचणी (तपासणी) करणेचा खर्च संबंधित ठेकेदाराचा राहील |
| | ९/७१६ दि ०४/०३/२०२४ | ४ | स्वामालकीची अथवा नोंदणीकृत भाडेतत्वावरील खाण व व्ही. एस आय स्टोन क्रशर असणे आवश्यक |
| | | ५ | खडी पुरवठा करणे या कामाकरीता समकक्ष कामाच्या दाखल्याची शासकीय, निमशासकीय, शासनाच्या तत्सम संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील तुल्यबळ कामाचे दाखले ग्राह्य धरण्यात येईल तसेच खडी पुरवठा करणे या कामाकरीता खाजगी संस्थेस मालाचा पुरवठा केल्या संबंधी दाखलेही ग्राह्य धरण्यात येईल. |
| | | ६ | सदरच्या कामसाठी वेळेत खडी पुरवठा होणे आवश्यक आहे, आवश्यकता भासल्यास निविदेतील सर्वात लघुत्तम दरानुसार टेंडरचे परिणाम विभागून अन्य एकापेक्षा अधिक ठेकेदारांना देणेत येईल ही अट रद्द करणेत येत आहे. (टेंडरचे परिमाण विभागून अन्य एकापेक्षा अधिक ठेकेदारांना देणेत येणार नाही.) |
| | | | |
| | | | कामाचे नाव :- येरवडा हॉट मिक्स प्लांट येथे कोल्ड मिक्स मालाचा पुरवठा करणे |
| २ | दि ५/१/२०२१ | १ | पुणे मनपा रजिस्ट्रेशन अट शिथिल |
| | | २ | सदर उत्पादनाचा माल पॅक स्वरुपात व त्यावरती उत्पादनाची सर्व माहितीसह (MTR सहित) पुणे मनपाच्या येरवडा हॉट मिक्स प्लान्ट येथेच खात्याच्या सुचनेनुसार पुणे मनपाच्या हद्दीत मागणीनुसार पुरविणे आवश्यक, पोच देणे आवश्यक आहे. |
| | | ३ | पुरवठा करणेत येणाऱ्या मालाची वेळोवेळी पुणे मनपाच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेचे रिपोर्ट सादर करणे आवश्यक राहील |
| | | ४ | मालाची वाहतुकी करिता आवश्यक सर्व शासकीय व वाहतुक पोलिस विभागाची परवानगी घेणे ठेकेदाराची जबाबदारी असणार आहे. |
| | | ५ | यशस्वी ठेकेदाराने आवश्यक वजनाचे, खात्याच्या सुचनेनुसार योग्य वजनाचे ५० टन लोखंडी रॅमर पुरविणे आवश्यक आहे. |
| | ९/७१६ दि ०४/०३/२०२४ | ६ | सदर निविदा प्रक्रिये मध्ये भाग घेणे करिता कोल्ड मिक्स उत्पादक कंपनी अथवा कोल्ड मिक्स उत्पादक कंपनी सोबत केलेला नोंदणीकृत भाडेकरार असणे आवश्यक आहे. |
| | | ७ | कोल्ड मिक्स पुरवठा करणे या कामाकरीता खाजगी संस्थेस मालाचा पुरवठा केल्या संबंधी दाखलेही ग्राह्य धरण्यात येईल. |

(अधिक्षक अभियंता)

| | | |
|---|---|---|
| | | कामाचे नाव :- येरवडा हॉट मिक्स प्लांट येथून मालाची वाहतूक करून रस्ते resurfacing करणे |
| | १ | सदरचे काम रस्ते रिसर्फेसिंगची असून कामे वेळेत व्यवस्थितरित्या पुर्ण होणेकरिता आवश्यक असल्यास एकूण ट्रकचे परिमाण सर्वात कमी (लोएस्ट) दरानुसार ट्रकचे परिमाण विभागून एकापेक्षा अधिक ठेकेदारांना देणेत येईल. |
| | २ | सदरचे काम मुख्यतः येरवडा हॉट मिक्स प्लांट येथून डांबरी मिक्स मालाची वाहतुक करून रिसर्फेसिंगची करावयाचे असून ठेकेदाराकडे ८ डंपर असणे आवश्यक व सुस्थितीत १ पेव्हर टन क्षमतेचे २ रोलर व लेबर टिम (तार ब्रश,खराटा,झारी मॅकॅनिकल ब्रुमर व कॉम्प्रेसर मशिन आवश्यक साहित्य) असणे आवश्यक. |
| | ३ | स्वमालकीची यंत्र सामुग्री अथवा स्वसाक्षांकित व नोटरीकृत भाडेतत्वावर घेतलेली यंत्रसा असणे आवश्यक राहिल. याबाबत कागदपत्रे जोडणे आवश्यक. (मा. महापालिका आयुक्त य ठराव क्र. ६/४५३ दि. ८/९/२०२२ मधील अ.क्र. २.९ मधील (फ) नुसार सुधारणा करण्यात आल आहे ) |
| १०/३७५ दि ९/३/२०२१ | ४ | ठेकेदाराने खात्याचे सुचनेनुसार रात्रपाळी / दिवसपाळी मध्ये काम करावयाचे आहे. |
| | ५ | साईटवर कोट सुचनेनुसार पसरल्यानंतर रिकामे बॅरल पुन्हा बॅच मिक्स प्लान्ट येथे [illegible] करावयाचे आहे. |
| | ६ | काही कारणामुळे डांबरी मिक्स मालाचे उत्पादन न झाल्यास त्या दिवसाचे कोणतीही रक्कम अदा करण्यात येणार आहे. |
| | ७ | साईटवर मशिनरी मध्ये काही बिघाड झाल्यास ठेकेदाराने पर्यायी व्यवस्था करावयाची आ तथापि डांबरी मिक्स माल जागेवर पसरविणे शक्य न झाले तर सदर मिक्स मालाची रक्कम ठेकेदाराचे बिलातून वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| | ८ | डंपर, पेव्हर, रोलर व इतर मशिनरी साठी लागणारे डिझेल व इतर साहित्य ठेकेदाराने पुरवा आहे. तसेच डंपर, पेव्हर, रोलर ला GIS Tracking, स्काडा असणे आवश्यक. |
| | ९ | सदर कामासाठी वाहतुक विभाग यांची आवश्यक ती परवानगी घेणेची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहिल. तसेच साईटवर ट्रॅफिक नियोजन करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल |
| | | |
| ९/७१६ दि ०४/०३/२०२४ | | कामाचे नाव :- येरवडा हॉट मिक्स प्लांट येथे हायवा/डंपर व मशीनरी भाडेतत्वावर पुरविणे |
| | १ | सदरचे काम मुख्यतः येरवडा हॉट मिक्स प्लांट येथून डांबरी मिक्स मालाची वाहतुक करून दुरुस्ती करावयाचे असून ठेकेदाराकडे ७ हायवा/डंपर, ७ रोलर व ७ लेबर टिम (तार ब्र खराटा, झारी इ. आवश्यक साहित्य) असणे आवश्यक |

(अनिरुद्ध पावसकर)
मुख्य अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कामाचे नाव- पुणे महानगरपालिका येरवडा हॉट मिक्स प्लांट करीता डांबर ( व्ही. जी. 30/40 ग्रेड ),LDO, इमलशन बॅरल (आर. एस.१/ आर. एस.2 ) उत्पादक कंपनी कडून खरेदी करणे व मालाची वाहतूक करणे. |
| | | १ | सदर कामाकरीता रजिस्ट्रेशन अट शिथील आहे. |
| | | २ | पुरवठादार निवीदेदवारे प्राप्त L-1 ठेकेदार यांनी निवीदे मध्ये नमूद केलेले मटेरियल HPCL/BPCL/Iocl/ HINDUSTAN COLAS या कंपनी कडून खरेदी करणे आवश्यक असून त्या सोबत उत्पादक कंपनीचे एम टी. सी. रिपोर्ट असणे बंधनकारक. |
| | | ३ | गाडी सोबत GIS Tracking system असणे बंधनकारक आहे. |
| | | ४ | HPCLUBPCL/IOCL/ HINDUSTAN COLAS या उत्पादक कंपन्यांना देखील सदर निवीदा स्पर्धेमध्ये भाग घेता येईल. |
| | | ५ | निवीदे दवारे प्राप्त यशस्वी ठेकेदाराकडे आवश्यकतेनुसार डांबराची, एल. डी ओ व इमलशन बॅरल ची मागणी करणेत येईल त्याप्रमाणे त्वरीत विहीत मुदतीत माल देण्याची अशा ठेकेदाराने व्यवस्था करावी. |
| | | ६ | पुणे मनपा येरवडा बॅच मिक्स प्लांट वर दररोज होणारी हॉट मिक्स मालाची निर्मिती ही मुख्यतः डांबरावर अवलंबून असल्याने मागणी प्रमाणे डांबर व एल डी ओ,इमलशन बॅरल विहीत वेळेत न मिळाल्याने अडचण निर्माण झाल्यास पुरवठादार यास प्रती दिन 10,000/- दंड आकारण्यात येईल. |
| 5 | ला. छाननी समिती (५२/१५.२.२३) | ७ | हॉट मिक्स प्लांट कडे प्राप्त होणाऱ्या डांबर/एल. डी. ओ ईमलशन (आर एस १ /आर एस 2) पुरवठा करणाऱ्या गाडी समवेत संबंधीत HPCL/BPCL/IOCL कंपनी tax इन्व्हाइस (वजन नमूद असलेली) सादर करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष भरेल त्या वजनानुसारच व त्या दिवशीच्या दरावर निवीदा दरानुसार (कमी/अधिक) प्रमाणेच बिल अदा करणेत येईल. |
| | | ८ | प्रस्तुत टेंडर करीता पुणे मनपा मान्य दरपत्रकातील बेसिक सन 2023-2024 दर घेण्यात आलेले आहेत. परंतु डांबर/एल. डी. ओ. / ईमलशन (आर एस १/आर एस 2) इ. मालाचे दर हे प्रती महिना बदलत असतात त्या मालानुसार लागू होणाऱ्या दराने HPCL/BPCL/IOCL/HINDUSTAN COLAS या कंपन्या मालाची विक्री करतात ही वस्तुस्थिती पाहता HPCL/BPCL/IOCL/HINDUSTAN COLAS या कंपन्यांनी माला पोटी आकारणी चे रकमेचे टॅक्स Invoice पुरवठा करणाऱ्या ठेकेदारास रक्कम प्रदान करते समयी विचारात घेतले जाईल. |
| | | ९ | पुरवठा करणाऱ्या ठेकेदारास भाववाढ सूत्र लागू राहणार नाही. |
| | ठ. क्र. ५/७१६ दि. [illegible] | १० | डांबर वाहतूक करणे या कामाकरीता खाजगी संस्थेस मालाचा पुरवठा केला संबंधी दाखले ग्राह्य धरणेत येईल |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कामाचे नाव:- पुणे महानगरपालिका येरवडा हॉट मिक्स प्लांट करीता डांबर ( व्ही. जी. 30/40 ग्रेड ),LDO. इमलशन बॅरल (आर. एस.१/ आर. एस.2 ) उत्पादक कंपनी कडून खरेदी करणे व मालाची वाहतूक करणे. |
| | | १ | सदर कामांकरीता रजिस्ट्रेशन अट शिथील आहे. |
| | | २ | पुरवठादार निवीदेदवारे प्राप्त L-1 ठेकेदार यांनी निवीदे मध्ये नमूद केलेले मटेरियल HPCL/BPCL/Locl/ HINDUSTAN COLAS या कंपनी कडून खरेदी करणे आवश्यक असून त्या सोबत उत्पादक कंपनीचे एम.टी. सी. रिपोर्ट असणे बंधनकारक. |
| | | ३ | गाडी सोबत GIS Tracking system असणे बंधनकारक आहे. |
| | | ४ | HPCL/BPCL/IOCL/ HINDUSTAN COLAS या उत्पादक कंपन्यांना देखील सदर निवीदा स्पर्धामध्ये भाग घेता येईल. |
| | | ५ | निवीदे दवारे प्राप्त यशस्वी ठेकेदाराकडे आवश्यकतेनुसार डांबराची/ एल. डी.ओ.व इमलशन बॅरल ची मागणी करणेत येईल त्याप्रमाणे त्वरीत विहीत मुदतीत माल देण्याची अशी ठेकेदाराने व्यवस्था करावी. |
| | | ६ | पुणे मनपा येरवडा हॉट मिक्स प्लांट वर दररोज होणारी हॉट मिक्स मालाची निर्मिती ही मुख्यत: डांबरावर अवलंबून असल्याने मागणी प्रमाणे डांबर व एल डी ओ.इमलशन बॅरल विहीत वेळेत न मिळाल्याने अडचण निर्माण झाल्यास पुरवठादार यास प्रती दिन 10,000/- दंड आकारण्यात येईल. |
| 5 | ता. छाननी समिती १९२/१५.२.२३ | ७ | हॉट मिक्स प्लांट कडे प्राप्त होणाऱ्या डांबर/एल. डी. ओ ईमलशन (आर एस 1 / आर एस 2) पुरवठा करणाऱ्या गाडी समवेत संबंधीत HPCL/BPCL/IOCL कंपनी tax इन्व्हाइस (...नमूद असलेली) सादर करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष भरेल त्या वजनानुसारच व त्या दिवशीच्या दरावर निवीदा दरानुसार (कमी/अधिक) प्रमाणेच बिल अदा करणेत येईल. |
| | | ८ | प्रस्तुत टेंडर करीता पुणे मनपा मान्य दरपत्रकातील बेसिक सन 2023-2024 दर घेण्यात आलेले आहेत. परंतु डांबर/एल. डी. ओ. / ईमलशन (आर एस 1/आर एस 2) इ. मालाचे दर हे प्रती महिना बदलत असतात त्या मालानुसार लागू होणाऱ्या दराने HPCL/BPCL/IOCL/HINDUSTAN COLAS या कंपन्या मालाची विक्री करतात ही वस्तुस्थिती पाहता HPCL/BPCL/IOCL/HINDUSTAN COLAS या कंपन्यांनी माला पोटी आकारणी चे रकमेचे टॅक्स Invoice पुरवठा करणाऱ्या ठेकेदारास रक्कम प्रदान करते समयी विचारात घेतले जाईल. |
| | | ९ | पुरवठा करणाऱ्या ठेकेदारास भाववाढ सूत्र लागू राहणार नाही. |
| | | १० | डांबर वाहतूक करणे या कामाकरीता खाजगी संस्थेस मालाचा पुरवठा केला संबंधी दाखले ग्राह्य धारणेत येईल |
| | ठ.क्र. ९/७१८ दि. ४/३/२४ | | पुणे महानगरपालिके साठी डांबर खरेदी करणाऱ्या ठेकेदारासोबत डांबर वाहतूक करणे आवश्यक |

[illegible] मुंबई [illegible]

[illegible] तालिका क्र. 1

१. सदर कामाकरिता नोंदणीकृत कंत्राटदार असणेबाबतची अट शिथिल करण्यात येत आहे.
२. ठेकेदाराचे स्वत:च्या मालकीचे अथवा भाडेकरावर ४ बाऊझर असणे आवश्यक (डांबर वाहतुकीकरिता)
३. ठेकेदाराचे स्वत:च्या मालकीचे अथवा भाडेकरावर १० ते १२ कि.ली मटेरियल वाहतुक क्षमतेचे २ टँकर असणे आवश्यक (एल.डी.ओ. वाहतुकीकरिता)
४. ठेकेदाराचे स्वत:च्या मालकीचे अथवा भाडेकरावर २ ट्रक इमल्शन ड्रम वाहतुकीकरिता असणे आवश्यक (इमल्शन ड्रम वाहतुकीकरिता)
५. वाहतुक परमिट व गाड्यांचे सर्व पेपर जोडणे आवश्यक.
६. कंपनी/रिफायनरी मधून डांबर , एल.डी.ओ. इमल्शन ड्रम भरते वेळेस व प्लान्टवर खाली करतेवेळेस प्रशिक्षित कामगार असणे आवश्यक.
७. ठेकेदार यांचे डांबराने भरलेले बाऊझर, एल.डी.ओ. टँकर व इमल्शन ड्रमने भरलेले ट्रक काही अपरिहार्य कारणास्तव हॉट मिक्स प्लान्ट येथे उभे राहिल्यास त्याचे कोणतेही जादा आकार अदा केले जाणार नाही. त्याच प्रमाणे त्याबर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.
८. खात्यामार्फत आवश्यकतेनुसार चलन देणेत येईल त्याप्रमाणे हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो.लि. , भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि. व मे.हिंदुस्थान कोलास प्रा.लि. मुंबई येथून माल देणेत येईल कंपनी मधून देणेत आलेल्या चलना मध्ये नमुद केले पेक्षा कमी माल प्लान्टवर आल्यास त्याची रक्कम ठेकेदाराच्या बीलातून वसूल करणेत येईल.
९. यशस्वी ठेकेदाराने निविदा प्राप्त होताच खात्यास निविदा अटी शर्ती प्रमाणे कागदपत्रे देणे आवश्यक आहे.
१०. VTS (Vehicle Tracking System) असणे बंधनकारक.
११. यशस्वी ठेकेदाराने निविदा कार्यादेश प्राप्त होताच रु.रु. ५ लक्ष ची डी.डी. खात्याकडे जमा करण्यात यावा काम पुर्ण झाल्यानंतर डी.डी. ची रक्कम परत करण्यात येईल.
१२. खात्यास आवश्यकता वाटल्यास एकुण टेंडरचे परिमा, सर्वात लोएस्ट दरानुसार टेंडरचे परिमाण समप्रमाणात विभागून अन्य एकापेक्षा अधिक ठेकेदारांना देणेत येतील याची सर्वस्वी खाते प्रमुखांनी राखून ठेवले आहेत. याबाबत कोणाचीही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

मुख्य अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका